

# SAF चा PCA पर्यंतचा प्रवास (भाग २)

**सौ. सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.

मागील अंकात आपण PCA मध्ये नमुद केलेल्या आर्थिक निकषांबाबत माहिती करुन घेतली होती. आता आपण या आर्थिक निकषांचे उल्लंघन झाल्यास रिझर्व्ह बँकेकडून केल्या जाणाऱ्या खालीलप्रमाणे विवेकी (Discretionary) कारवाईबद्दल माहिती करुन घेऊयात.

**१) विशेष पर्यवेक्षकीय कारवाई:**

i. त्रैमासिक अथवा अन्य वेळी विशेष पर्यवेक्षकीय देखरेख सभा
ii. बँकेची खास तपासणी किंवा लक्षित छाननी (Targeted Scrutiny)
iii.सध्याच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेअंतर्गत किंवा बाह्य लेखापरीक्षकांकडून बँकेचे विशेष किंवा अतिरिक्त लेखापरीक्षण करणे.
iv. विलीनीकरण वा पुनर्रचनेंतर्गत बँकेची सोडवणूक




**२) धोरणासंबंधी कारवाई – रिझर्व्ह बँकेकडून बँकेला खालीलप्रमाणे सूचना देण्यात येतील.**

i. पर्यवेक्षकाने मंजूर केलेली कृती योजना कार्यान्वित करणे.
ii. तिमाही अथवा मासिक कालावधीत कृती योजनेंतर्गत बँकेच्या कामकाजातील प्रगतीचा आढावा घेणे.
iii. मध्यव व दीर्घकालीन व्यवहार्यता, टिकाऊपणा व नफाक्षमता इ. संदर्भात बँकेच्या व्यावसायिक मॉडेलचा तपशीलवार आढावा घेणे.
iv. तात्काळ उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यावर लक्ष केंद्रीत करुन अल्पकालीन धोरणांचे पुनरावलोकन करणे.
v. मध्यम मुदतीच्या व्यावसायिक योजनांचे पुनरावलोकन करणे, साध्य करण्याजोगी उद्दिष्टे शोधून काढणे, प्रगती आणि यशासाठी भक्कम उद्दिष्टे ठेवणे.
vi. बँकेच्या कामकाजाची पुनर्रचना करणे.
vii.बँकेच्या ताळेबंदाच्या आकाराच्या वाढीवर बंधने घालणे.
viii. जर घेतलेले निर्णय अपेक्षित परिणाम देत नसतील तर त्या बँकेच्या विलीनीकरणाच्या पर्यायाची चाचपणी करणे किंवा बँकेचे पतसंस्थेत रुपांतर करणे.

**३) सुप्रशासनाशी संबंधी कारवाई:**

i. योग्य वाटल्यास बँकेच्या संचालक मंडळावर रिझर्व्ह बँक सक्रीय सहभाग घेईल.
ii. बँकेतील व्यवस्थापकीय पदावरील व्यक्तींना काढून टाकणे.
iii. बँकिंग नियमन कायद्यातील कलम ३६ अअअ अन्वये संचालक मंडळास हटवणे.

iv. बँकेच्या संचालक मंडळावर अतिरिक्त संचालकांची नियुक्ती करणे.




v. बँकेवर आवश्यकतेनुसार इतर अटी व निर्बंध लादणे.

**४) भांडवल वृद्धीसंबंधी कारवाई:**

i. एका वर्षात भांडवल पर्याप्तता प्रमाण किमान पातळीवर नेण्यासाठी बँक मंजूर कृती आराखडा तयार करेल.
ii. अतिरिक्त भांडवल उभारण्यासाठी योजना आणि प्रस्ताव सादर करणे.
iii. जमा केलेल्या नफ्यातून राखीव निधीत वाढ करणे.
iv. मुख्य नसलेल्या व्यवसायातील गुंतवणूकींवर निर्बंध
v.भांडवल जपणूकीसाठी उच्च जोखीम-भारित मालमत्तेच्या विस्तारावर निर्बंध
vi.भांडवल जपणूकीसाठी उच्च जोखीम-भारित क्षेत्रास देण्यात येणाऱ्या कर्जात कपात करणे.

**५) पत जोखीमसंबंधी कारवाई:**

i. अनुत्पादित कर्जाचा साठा कमी करण्यासाठी संचालक मंडळ कालबद्ध योजना तयार करेल.
ii. नवीन अनुत्पादित कर्जे तयार होऊ नयेत यासाठी योजना तयार करणे.
iii. अनुत्पादित कर्जे तथा गुंतवणूकींसाठी जास्त तरतुदी करणे.
iv. कर्ज पूनरावलोकन यंत्रणा मजबूत करणे.
v. एकूण कर्ज जोखीम भाराची तीव्रता कमी करणे. ज्या कर्जांचा जोखीम भार १००% हून अधिक आहे, अशा नवीन कर्जांवर निर्बंध टाकणे, विनातारण कर्जांवर निर्बंध टाकणे.
vi. ज्या क्षेत्रातील कर्जामध्ये अनुत्पादित कर्जांचे प्रमाण जास्त आहे, अशा क्षेत्रास/व्यवसायास देण्यात येणारी कर्जे कमी करणे.
vii. नवीन कर्जांची मर्यादा कमी करणे.
viii.बिगर बँकिंग मालमत्तेची विक्री करणे.
ix. जास्त जोखीम असणाऱ्या मालमत्तेमध्ये घट व थकीत कर्जदारांच्या कर्ज मर्यादेचे नुतनीकरण टाळणे.
x. भौगोलिक जागा निहाय, उद्योग निहाय, कर्जदार निहाय निश्चित करुन कृती आराखडा तयार करणे आणि कार्यक्षम वसुली पथक, अदालत आदी उभारणे.
xi. शासकीय रोखे व इतर उच्च गुणवत्तेच्या तरल गुंतवणूकीव्यतिरिक्त इतर क्रेडिट/गुंतवणूक पोर्ट फोलिओच्या विस्तारावर बंदी.

**६) तरलता / बाजार जोखीमसंबंधी कारवाई:**

i. आंतर-बँक बाजारातून उचल घेण्यास वा व्यवहार करण्यास निर्बंध
ii. घाऊक ठेवी/खर्चिक ठेवींच्या नुतनीकरणावर निर्बंध
iii. ठेवींच्या आकाराच्या विस्तारावर निर्बंध
iv. अल्प मुदतीची देणी देण्याकरिता तरल मालमत्ता वाढवणे.




**७) मानवी संसाधनसंबंधी कारवाई:**

i. कर्मचाऱ्यांच्या विस्तारावर निर्बंध

ii. बँकेत कार्यरत विद्यमान कर्मचाऱ्यांच्या विशेष प्रशिक्षण गरजांचा आढावा

**८) नफासंबंधी कारवाई:**

i. भांडवली खर्चांवर योग्य निर्बंध

ii. कामकाजीय खर्चात कपात

**९) कामकाजाशी/व्यवसायाशी संबंधित कारवाई:**

i. प्रशासकीय खर्च कमी करणे

ii. शाखाविस्तार योजनांवर निर्बंध

iii. मुख्य नसलेल्या व्यावसायिक क्रिया कमी करणे

iv. नवीन व्यवसाय सुरु करण्यावर निर्बंध

v. बिनवित्तीय व्यवसायात कपात करुन Leverage कमी करणे

vi. जोखीमधारक मालमत्तेत घट

vii. नॉन क्रेडिट मालमत्ता निर्मितीवर निर्बंध

viii. नवीन उचल घेण्यावर निर्बंध

ix. तोटा देणारे, न चालणारे व्यवसाय बंद करणे.

x. तोट्यात चालणाऱ्या शाखा बंद करणे अथवा त्यांचे इतर शाखेत विलीनीकरण करणे.

**१०) अन्य कारवाई:**

i. बँकेची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन रिझर्व्ह बँक योग्य वाटेल अशी इतर कोणतीही कारवाई करेल.

वरीलप्रमाणे माहिती प्रसारित करणारे परिपत्रक दि. ०१ एप्रिल, २०२५ पासून समस्त नागरी सहकारी बँकांना लागू केले जाणार आहे. रिझर्व्ह बँकेकडून SAF/PCA मध्ये असणाऱ्या बँकांवर केली जाणारी सक्तीची कारवाई (mandatory action) किंवा विवेकाधीन कारवाई (discretionary action) पाहता बँकांनी आपापला ताळेबंद सुदृढ कसा राहील, सर्व आर्थिक घटक (financial parameters) उत्तम कसे राहतील याबाबत सजग राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे आपले बँकिंग कामकाज पारदर्शकपणे कसे पार पाडता येईल, याची विशेष काळजी घेतली तरच रिझर्व्ह बँकेकडून SAF तथा PCA अंतर्गत होणाऱ्या कारवाईपासून बँकांना आपला बचाव करता येईल.

******

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनतर्फे माहे ऑक्टोबर २०२४ मध्ये नागरी सहकारी बँकांचे पदाधिकारी, व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.**




१) फेडरेशनतर्फे नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी दि. २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी 'Risk Management and Compliance Management' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून दि नाशिक मर्चंटस् को-ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **मा. श्री. विश्राम दिक्षित** यांनी Risk Management, different types of risks, Best practices for risk control, Compliance Policy – its Contents and Objectives etc. अशा विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. तद्नंतर रिझर्व्ह बँकेचे उप महाव्यवस्थापक **मा. श्री. व्ही. जॉर्ज कोशी** यांनी Importance of Compliance Management, Compliance Functions in Regulatory Entities, Compliance Issues and Deficiencies, Role of Chief Compliance Officer etc. विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. तसेच बँकिंग तज्ञ **मा. श्री. माधव प्रभुणे** यांनी Risk Management विषयावर Case studies घेतल्या.

*****